MHSO190017882023

| | |
|---|---|
| प्राप्त दिनांक – | ०२/०८/२०२३ |
| नोंदणी दिनांक – | ०२/०८/२०२३ |
| निकाल दिनांक – | **०२/०४/२०२६** |
| कालावधी – | वर्ष महिने दिवस |
| | ०२ ०८ ०० |

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मोहोळ यांचे न्यायालयात

## (पिठासिन अधिकारी श्रीमती पी.एस.गोवेकर)

**नियमित फौजदारी खटला क्र.२८२/२०२३**

**निशाणी क्र. ४३**

**अभियोग पक्ष**

महाराष्ट्र शासन,
तर्फे : पोलीस स्टेशन अधिकारी,
पोलीस स्टेशन, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

**अभियोग पक्षातर्फे**

श्री डी.पी. गाढवे
सहा. सरकारी अभियोक्ता

**आरोपी**

१ **समाधान रामचंद्र वाघमोडे**,
वय – ३२ वर्षे, व्यवसाय – नोकरी

२ **ज्योती बापु वाघमोडे**,
वय – २८ वर्षे, व्यवसाय – घरकाम

३ **भिवराबाई रामचंद्र वाघमोडे**,
वय – ५५ वर्षे, व्यवसाय – घरकाम

४ **बापुसाहेब रामचंद्र वाघमोडे**,
वय – ३८ वर्षे, व्यवसाय – शेती

५ **रामचंद्र नारायण वाघमोडे,**
वय – ६४ वर्षे, व्यवसाय – सेवानिवृत्त
सर्व रा.उजनी कॉलनी वसाहत, कुरुल, ता.मोहोळ,
जि.सोलापूर.

**आरोपीतर्फे वकील** श्री. एच.बी.शिंदे.

| | |
|---|---|
| गुन्हा घडलेचा दिनांक | दि.२८/०२/२०१७ ते २१/०५/२०१७ चे दरम्यान. |
| गुन्हा रजिस्टर क्रमांक | ८४०/२०२१ |
| दोषारोपपत्र न्यायालयात दाखल दिनांक | ०२/०८/२०२३ |
| दोषारोप ठेवलेचा दिनांक | २५/०९/२०२३ |
| साक्षीपुरावा सुरु झालेचा दिनांक | ०७/०२/२०२५ |
| युक्तिवाद दिनांक | १३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०२/०४/२०२६ |
| दोषसिध्दी व शिक्षेबाबत आदेश | निर्दोष. |

**आरोपीची माहिती**

| अ.क्र | आरोपीचे नांव | आरोपीस अटक दिनांक | आरोपीस जामिनावर खुले केलेचा दिनांक | दोषारोपा–तील कलम | आरोपीस दोषमुक्त किंवा दोषसिध्द केले | आरोपीस झालेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ नुसार आरोपीने संपरिक्षे दरम्यान भोगलेली शिक्षा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | समाधान रामचंद्र वाघमोडे | सी.आर.पी.सी. ४१(अ)(१) प्रमाणे नोटीस | ०३/११/२०२१ | भा.दं.वि.स क.४९८(अ), ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ज्योती बापु वाघमोडे | सी.आर.पी.सी. ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | ०३/११/२०२१ | भा.दं.वि.स क.४९८(अ), ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | – |
| ३ | भिवराबाई रामचंद्र वाघमोडे | सी.आर.पी.सी. ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | ०३/११/२०२१ | भा.दं.वि.स क.४९८(अ), ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | – |
| ४ | बापुसाहेब रामचंद्र वाघमोडे | सी.आर.पी.सी. ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | ०३/११/२०२१ | भा.दं.वि.स क.४९८(अ), ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | – |
| ५ | रामचंद्र नारायण वाघमोडे | सी.आर.पी.सी. ४१(अ) (१) प्रमाणे नोटीस | ०३/११/२०२१ | भा.दं.वि.स क.४९८(अ), ५०४, ५०६ सह ३४ अन्वये | निर्दोष मुक्तता | -- | – |

## अभियोग पक्षातर्फे घेतलेल्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | साक्षीदाराचे नांव | निशाणी क्रमांक | साक्षीदाराचे स्वरुप |
|---|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | अपर्णा समाधान वाघमोडे | २६ | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२ | व्यंकटेश विनायक मोटे | ३२ | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | मंदाकिनी विनायक मोटे | ३३ | साक्षीदार |
| अ.सा.क्र.४ | मालती भगीरथ नागणे | ३६ | साक्षीदार |

**अभियोग पक्षातर्फे सिध्द केलेले दस्तऐवज**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | तपशिल |
|---|---|---|
| -- | -- | -- |

# <u>न्या य नि र्ण य</u>

(दि.०२/०४/२०२६)

प्रस्तुत आरोपींनी भारतीय दंड विधान (यापुढे भा.दं.वि. असा संक्षिप्त उल्लेख करण्यात येतो) कलम ४९८(अ), ५०४ व ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत खटला चालविण्यात आला.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –</u>**

२. दि.१५/०९/२०२१ रोजी फिर्यादी अपर्णा समाधान वाघमोडे, रा.विनायक ड्रेसेस, मेन रोड, मोहोळ, ता. मोहोळ सोलापूर, जि.सोलापूर हिने मोहोळ पोलीस ठाणे येथे हजर राहून खबर दिली की, तिचा विवाह आरोपी क्र.१ समाधान रामचंद्र वाघमोडे याचेशी दि.२८/०२/२०१७ रोजी झाला. लग्नानंतर ती तिच्या सासरी मौजे कुरुल येथे नांदण्यासाठी गेली. लग्नानंतर सुरुवातीचे एक महिना तिचे सासरचे लोकांनी तिला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर फिर्यादीची नणंद व नंदवा हे तिच्या घरी येऊन तिच्याविषयी खोटेनाटे सांगू लागले व त्यामुळे तिच्या सासरच्या लोकांनी सतत मारहाण, शिवीगाळी करणे, चारीत्राचा संशय घेणे असे करुन शारीरीक व मानसिक त्रास देवू लागले. आरोपींनी फिर्यादीकडे माहेरुन पैसे घेऊन येण्याची मागणी केली. दि.२१/०५/२०१७ रोजी आरोपींनी फिर्यादीकडे ५० लाख रुपये व २५ तोळे सोने घेऊन येण्याची मागणी केली व त्यासाठी तिला शिवीगाळी, दमदाटी केली व तिला नांदवणार नसल्याचे सांगून तिला घरातून हाकलून दिले. तेव्हापासून फिर्यादी ही माहेरी राहत आहे. आरोपींनी फिर्यादीचा लॅपटॉप, शैक्षणिक कागदपत्रे परत केलेले नाही. त्यामुळे फिर्यादी दि.०६/०६/२०२१ रोजी सासरी गेली असता आरोपींनी तिचा लॅपटॉप व शैक्षणिक कागदपत्रे देण्यास नकार दिला व तिला घरातून हाकलून दिले. त्यावेळी फिर्यादीचा दिर आरोपी क्र.४ बापु याने फिर्यादीला धमकी दिली की, तु जर कोर्टात, पोलीसांकडे फिर्याद दिली तर तुझ्या नावाची चिठ्ठल लिहून गळफास घेईन. म्हणुन फिर्यादीने आरोपींविरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली.

३. सदर जबाबावरुन प्रस्तुत आरोपीने भा.दं.वि. कलम ४९८(अ), ५०४ व ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत आरोपींविरुध्द मोहोळ पोलीस ठाणे येथे गु.र.नं.५५४/२०२१ नोंद करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास म.पो.हे.कॉ./४४३/श्रीमती एम.बी.नागरे यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले. आरोपींना अटक केली. उर्वरित तपास पूर्ण करुन आरोपीने उपरोक्त नमूद कलमान्वये गुन्हा केल्याचे नमूद करुन दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींनी भा.दं.वि. कलम ४९८(अ), ५०४ व ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत माझ्या पुर्विाधिका–यांनी आरोपींविरुध्द नि.१२ वर दोषारोप ठेवून त्यातील मजकूर आरोपींना वाचून व समजावून सांगितला असता त्यांनी निवेदन नि.१३ ते १७ प्रमाणे नोंदवून गुन्हा कबुल नसल्याचे नमूद केले. सबब, खटल्याचे कामकाज पुढे चालविण्यात आला.

५. आरोपीविरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप शाबित करण्यासाठी अभियोग पक्षाद्वारा एकुण ०५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. पैक फिर्यादी अपर्णा समाधान वाघमोडे (अ.सा.क्र.१) यांची साक्ष नि.२६, व्यंकटेश विनायक मोटे (अ.सा.क्र.२) यांची साक्ष नि.३२, मंदाकिनी विनायक मोटे (अ.सा.क्र.३) यांची साक्ष नि.३३ आणि मालती भागीरथ नागणे (अ.सा.क्र.४) यांची साक्ष नि.३६ प्रमाणे नोंदविण्यात आली. अभियोग पक्षास वारंवार व पुरेशी संधी देऊनही अभियोग पक्ष प्रस्तुत खटल्यातील इतर साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात अपयशी झाल्याने दि.२४/०२/२०२५ रोजी नि.१ वर आदेश पारीत करुन अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

६. आरोपींचा फौ. प्र. सं. क. ३१३ अन्वये निवेदन नि.३८ ते ४२ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्या निवेदनामध्ये फिर्यादीने आर्थिक व मानसिक त्रास देण्यासाठी प्रस्तुतची खोटी केस दाखल केली असल्याचे सांगितले आहे.

७. उभय पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

८. अभियोग पक्षाच्या कथनावरुन विचारार्थ उपस्थित झालेल्या बाबी व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नमूद करण्यात आले आहेतः

| **अ.क्र.** | **विचारार्थ बाबी** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि.०५/०३/२०१७ रोजी ते दि.१५/०९/२०२१ रोजी दरम्यान | |

| | | |
|---|---|---|
| | फिर्यादीचे सासरी कुरुल, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथे आरोपींनी संगनमत करुन बेकायदेशीरपणे फिर्यादीला माहेरुन रक्कम रु.५०,००,०००/– व २५ तोळे सोने घेवून येण्याची मागणी करुन तिचा शारीरीक व मानसिक छळ केला व तिला क्रुर वागणुक दिली हे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | नाही. |
| २. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला शिवीगाळ करुन जाणीवपूर्वक अपमानित केले व सदर कृत्यामुळे तिचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा एखादा अपराध घडण्याची शक्यता असल्याची जाणीव असुन देखील तिला तसे करण्यास प्रक्षोभित केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |
| ३. | उपरोक्त तारखेस, वेळी व ठिकाणी, प्रस्तुत आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला दमदाटी करुन फौजदारी धाकदडपशा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? | नाही. |
| ४. | काय आदेश ? | आरोपींना निर्दोष मुक्त केले. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>विचारार्थ बाब क्र. १ ते ३ करीता</u> :–**

९. सर्व बाबी एकाच घटनेवर आधारीत असल्याने विवेचनामध्ये पुराव्याची पुन:वृत्ती टाळण्याकरीता त्या एकत्रीतपणे विचारात घेत आहे.

१०. दोन्ही विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.डी.पी.गाढवे यांच्यामार्फत असा युक्तिवाद करण्यात आला की, अभिलेखावरील पुराव्याचा विचार करता अभिलेखावरील पुरावा हा आरोपीवरील आरोप सिद्ध करण्याइतपत पुरेसा आहे म्हणुन त्यांनी आरोपीला कडक शासन करण्याची विनंती केली.

११. याउलट आरोपींतर्फे विधीज्ञ श्री.एच.बी.शिंदे यांच्यामार्फत असा युक्तिवाद करण्यात

आला की, अभिलेखावरील पुरावा हा आरोपीवरील आरोप सिद्ध करण्याइतपत पुरेसा नाही म्हणुन त्यांनी आरोपींना निर्दोष मुक्त करुन सोडुन देण्याची विनंती केली.

१२. वर नमुद युक्तिवादाच्या पार्श्वभुमीवर अभिलेखाची पहाणी केली असता असे स्पष्ट होते की, प्रस्तुत खटल्यातील फिर्यादी अपर्णा समाधान वाघमोडे हिने तिला होणा–या त्रासाबाबत व तिच्या सोबत घडलेल्या घटनांबाबत खबर दिल्यामुळे प्रस्तुत गुन्हा नोंद झाला. त्याच प्रमाणे तपासाचे चक्र सुरु झाले. त्याअनुषंगाने फिर्यादी हिच्या साक्षीचे अवलोकन करणे महत्वाचे आहे. फिर्यादी अपर्णा समाधान वाघमोडे (स.सा.क्र.१) हिच्या साक्षीत असे आले आहे की, घटना दि.२१/०५/२०१७ रोजी कुरुल, ता.मोहोळ येथे घडली. त्यादिवशी आरोपींनी तिला माहेरुन पैसे व सोने घेऊन ये म्हणुन तिला हाकलून दिले. तिने आरोपींकडे वारंवार विनंती करुनही आरोपींनी तिला घरी घेतले नाही व तिचे शैक्षणिक कागदपत्रे देखील तिला दिलेले नाहीत. त्यामुळे दि.२८/०२/२०१७ रोजी ती माहेरी निघुन गेली. दुस–या दिवशीच आरोपी हे तिच्या घरी आले व फिर्यादीला धमकी दिली की, तु जर कोर्टात आमच्या विरोधात तक्रार केलीस तर मी आत्महत्या करेन व तुमच्या नावाची चिठ्ठी लिहून ठेवेन. त्यावेळी आरोपींनी फिर्यादीकडे ५० लाख रुपये व २५ तोळे सोने आणल्याशिवाय नांदवणार नसल्याचे सांगितले. काही दिवसांनी फिर्यादी व आरोपी क्र.१ यांच्यात घटस्फोट झाला व तिने महिला आयोगकडे व पोलीस स्टेशनला तक्रार नि.२७ प्रमाणे दाखल केली. छापील एफ.आय.आर. नि.२८ प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे.

१३. आरोपीतर्फे फिर्यादीचा उलटतपास नोंदवण्यात आला. उलटतपासामध्ये दि.२८/०२/२०१७ रोजी आरोपी क्र.१ सोबत लग्न झाल्याचे फिर्यादीने मान्य केले आहे. तसेच लग्नादिवशी कोणताही वाद, भांडण, तंटा झालेला नाही याबाबत माहित नसल्याचे कथन केले आहे. उलटतपासामध्ये फिर्यादीने सरतपासातील परिच्छेद क्र.२ मधील पहिल्या तीन ओळीतील मजकुर पोलीसांना जबाब देतेवेळी सांगितला होता असे कथन केले आहे व त्यापुढे त्या मजकुरामधील तारीख ही लग्नाची तारीख नमुद झाली आहे परंतु ती २१/०५/२०१७ आहे. पुढे उलटतपासामध्ये फिर्यादीने आरोपींविरुध्द दिलेली तक्रार खोटी ठरु नये व आरोपींना त्रास व्हावा म्हणुन घटस्फोटानंतर कुठेही पीएच.डी.साठी ॲडमीशन घेतले नव्हते असे स्पष्टपणे

मान्य केले आहे. दि.२८/०६/२०२२ रोजी फिर्यादी व आरोपी क्र.१ यांनी संमतीने घटस्फोट मिळवण्यासाठी अर्ज केल्याचे देखील फिर्यादीने मान्य केले आहे व सदर घटस्फोट अर्जामध्ये दोघांचे स्वभाव भिन्न असल्यामुळे व विचार वेगळे असल्यामुळे छोट्या–मोठ्या कारणावरुन गैरसमजुतीने भांडणे होतात व आरोपी क्र.१ व फिर्यादी १ मे, २०१७ पासून विभक्त राहत असल्याचा मजकुर नमुद असल्याचे मान्य व कबूल केले आहे. अशा परिस्थितीत फिर्यादीच्याच कथनाप्रमाणे कथीत घटना ही दि.२१/०५/२०१७ रोजी घडली असे असेल तर घटस्फोट अर्जातील दि.०१/०५/२०१७ पासून आरोपी क्र.१ व फिर्यादी स्वतः वेगळे राहत आहे या कथनाने कथीत घटना दि.२१/०५/२०१७ रोजी नेमकी कशी घडली याचा पुरावा पडताळणे आवश्यक ठरते. या अनुषंगाने फिर्यादीच्या साक्षीचे अवलोकन केले असता फिर्यादीने त्याबाबत कोणताही ठोस पुरावा दिलेला नाही.

१४. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ मंदाकिनी विनायक मोटे हिच्या सरतपासाचे अवलोकन करता तिने तिच्या साक्षी पुराव्यात असे कथन केले आहे की, फिर्यादी ही तिची मुलगी आहे. आरोपी तिच्या मुलीला टोचुन बोलणे, ऑफिसला जाताना तिचा पाठलाग करणे, मानसिक त्रास देणे अशा प्रकारचे त्रास देत होते. सर्व आरोपी तिच्या मुलीला त्रास देत होते. तिची मुलगी सासरच्या घरी गेली असताना आरोपींनी तिला घरात घेतले नाही व ती रात्रभर बाहेर बसून राहिली होती. त्यामुळे तिने आरोपी क्र.१ विरुध्द घटस्फोटाची मागणी केली व तिला घटस्फोट मिळू नये म्हणुन देखील आरोपींनी त्रास दिला आहे. आरोपी तिला क्षुल्लक कारणावरुन भांडण काढत होते व तिला रात्री झोपू देत नव्हते. त्यामुळे तिची मुलगी फिर्यादी ही त्यांचेकडे माहेरी राहत आहे. सदर साक्षीदाराने उलटतपासामध्ये आरोपी क्र.२ ते ५ हे कुरुल येथे राहण्यास आहेत हे मान्य केले आहे. तसेच त्यांची मुलगी म्हणजेच फिर्यादी हिचे तिच्या इच्छेविरुध्द लग्न झाले आहे असे तिचे म्हणणे होते हे देखील या साक्षीदाराने उलटतपासामध्ये मान्य केले आहे. तसेच लग्नानंतर पाच दिवसांनी येती–जाती या प्रथेसाठी फिर्यादी ही मोहोळ येथे माहेरी आली होती व त्यानंतर मोहोळमधुनच आरोपी क्र.१ सोबत पुणे येथे निघुन गेली ही बाब देखील साक्षीदाराने उलटतपासात मान्य केली आहे व त्यानंतर पुन्हा कुरुल येथे गेलेली नाही हे देखील उलटतपासामध्ये मान्य केले आहे. फिर्यादी व आरोपी क्र.१ यांच्यामध्ये तक्रारींबाबत वैयक्तिक कोणतीही माहिती नसल्याचे देखील सदर साक्षीदाराने मान्य केले आहे.

१५. अभियोग पक्षाने प्रस्तुत खटल्याचे कामी तपासिक अंमलदार साक्षीदार क्र.४ मालती भागरथ नागणे यांची साक्ष नोंदवली आहे. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासामध्ये असे कथन केले आहे की, दि.१५/०९/२०२१ रोजी फिर्याद दाखल झाल्यानंतर सदर गुन्ह्याचा तपास त्यांच्याकडे सोपवण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदरांचे टिपण नोंदवले व फिर्यादीकडे चौकशी केली. फिर्यादीने पुरवणी जबाब देऊन तिला तिची कागदपत्रे मिळाली असल्याचे सांगितल्याने आरोपीविरुध्द भा.द.वि.कलम ४०६ कमी करण्यात आले व त्याबाबतचा अहवाल नि.३७ प्रमाणे अभिलेखावर दाखल आहे. एकुणच त्यांच्या तपासामध्ये पाच आरोपींविरुध्द पुरावा निष्पन्न होत असल्याने त्यांनी आरोपीविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदार हिने गुन्ह्याचे कामी तपास काम केले असल्याने तिची साक्ष औपचारीक स्वरुपाची ठरते. सदर साक्षीदाराने फिर्यादी व आरोपी क्र.१ यांच्यामध्ये घटस्फोटाची प्रक्रिया सुरु असल्याबाबत सांगितले नसल्याचे कथन केले आहे. तसेच फिर्यादीने पुरवणी जबाबामध्ये रागाच्या भरात नंदेचे व तिच्या पतीचे नाव घेतले होते असा मजकुर सांगितल्याचे साक्षीदाराने मान्य केले आहे. तसेच गुन्ह्याच्या तपासकामी कुरुल गावी जाण्यास कोणतीही अडचण नसल्याचे देखील साक्षीदाराने मान्य केले आहे. सर्वात मुख्य बाब म्हणजे सदर तपासिक अंमलदार साक्षीदाराने केवळ मोहोळ मधील रहिवासी असलेल्या साक्षीदारांकडेच चौकशी केल्याचे मान्य केले आहे.

१६. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ व्यंकटेश विनायक मोटे यांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन करता त्यांना घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे सांगितले आहे. पोलीसांनी त्याच्याकडे चौकशी केली नसल्याचे देखील त्याचे कथन आहे. सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्याचे कारण देऊन न्यायालयाच्या परवानगीने सरकारी वकीलांनी त्याला उलटतपासात विचारता येण्याजोगी सूचक प्रश्ने विचारली असता तो त्याच्या सरतपासातील कथनावर ठाम राहिला आहे.

१७. वरील सर्व विवचेनावरुन फिर्यादीची कथने व इतर साक्षीदारांची कथने यामध्ये मोठ्याप्रमाणे तफावत असल्याचे दिसून येते. फिर्यादीने सांगितलेली घटना ही तिच्या म्हणण्याप्रमाणे दि. २१/०५/२०१७ रोजी घडली व त्यादिवशी फिर्यादी आरोपींनी माहेरुन

पैसे व सोने घेऊन ये म्हणुन हाकलून दिले परंतु इतर दोन साक्षीदार अभियोग साक्षीदार क्र.२ व अभियोग साक्षीदार क्र.३ हे फिर्यादीचे जवळचे नातेवाईक म्हणजेच भाऊ व आई असूनही त्यांनी फिर्यादीच्या या कथनास कोणताही दुजोरा दिलेला नाही. त्यामुळे भा.द.वि. कलम ४९८अ नुसार आवश्यक असलेल्या बाबी शाबीत करण्यास अभियोग पक्षास अपयश आल्याचे दिसून येते. फिर्यादीची कोणतीही कथने सबळ पुराव्यानिशी शाबीत झालेली नाही. याउलट, फिर्यादी व इतर साक्षीदारांनी उलटतपासात मान्य केलेल्या बाबींवरुन केवळ आरोपींना त्रास देण्यासाठी प्रस्तुतची फिर्याद दाखल केल्याचे दिसून येते. फिर्यादीची कथने ही मोघम स्वरुपाची असल्याने फिर्यादीच्या साक्षी पुराव्याबाबत संशय निर्माण होतो. त्यामुळे वरील सर्व विवचेनावरुन आरोपींनी फिर्यादी तिच्या माहेरुन ५० लाख रुपये व २५ तोळे सोने घेऊन ये म्हणुन तिचा शारीरीक व मानसिक छळ केला व दमदाटी करुन घरातून हाकलून दिले ही बाब सिध्द न झाल्याने मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवत आहे.

**विचारार्थ बाब क्र.४ करीता** :-

१८. आरोपींनी भा.दं.वि. कलम ४९८(अ), ५०४ व ५०६ प्रमाणे गुन्हा केला आहे हे अभियोग पक्ष सिध्द करु शकलेला नाही. त्यामुळे, प्रस्तुत आरोपी हे सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, विचारार्थ बाब क्र.४ करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आ दे श -

१. आरोपी क्र.१ **समाधान रामचंद्र वाघमोडे**, आरोपी क्र.२ **ज्योती बापु वाघमोडे,** आरोपी क्र.३ **भिवराबाई रामचंद्र वाघमोडे,** आरोपी क्र.४ **बापुसाहेब रामचंद्र वाघमोडे** आणि आरोपी क्र.५ **रामचंद्र नारायण वाघमोडे** सर्व रा.उजनी कॉलनी वसाहत, कुरुल, ता.मोहोळ, जि.सोलापूर यांची भा.दं.वि. कलम ४९८(अ), ५०४ व ५०६ प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपींनी यापूर्वी दिलेले जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत न्यायनिर्णयाची प्रत मा.जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर यांच्यामार्फत फिर्यादीला

देण्याकरिता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३६५ नुसार सदर प्रत मा.जिल्हा दंडाधिकारी, सोलापूर यांच्याकडे पाठविण्यात यावी.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७ (अ) चे पुर्ततेकामी रु.१५,०००/– प्रत्येकी बंधपत्र व जामीनदाराचे जामीनखत ०७ दिवसांचे आत सादर करावे. सदर जामिन आजपासून सहा महिन्यांच्या कालावधीनंतर रद्द झाल्याचे समजण्यात यावा.

PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR

Digitally signed by PALLAVI SHESHAGIRI GOVEKAR
Date: 2026.04.04 11:31:03 +0200

मोहोळ **(श्रीमती पी.एस.गोवेकर)**

दिनांक. ०२/०४/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मोहोळ

## **C E R T I F I C A T E**

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | Judicial Magistrate F.C. Mohol |
| Date | : | 02/04/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 02/04/2026 |
| Judgment Uploaded on | : | 04/04/2026 |